**<u>साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास विधीज्ञ श्री. एम.के. मलगे, शपथेवर सुरु ः-</u>**

मी व्यंकटेश नावाने व्यवसाय करतो. माझे दुकान नाईक चौक, देगलूर रोड वर आहे. ते भाडयाच्या जागेत आहे. माझे त्या ठिकाणी दुकान यांचा भाडे पट्टा मी दाखल केलेला नाही. त्या ठिकाणी सध्या माझे दुकान नाही. दुकान बंद केले म्हणून मी परवाना रद्द करुन घेतला नाही. दुकानाच्या नावाने बॅकेत माझे खाते चालू आहे. माझे दुकान चालू होते त्यावेळी रोजच्या रोज बॅकत भरणा करत होतो. मी जीकाय रक्कम शिल्लक राहिली ती रक्कम बॅकेत टाकत होतो.

रु. चार लाख सत्तर हजार रुपये रक्कम ही दुकान बंद झाल्यानंतर दि. २७.०८.२०१५ ला राजेश किशनराव जळकोटकर व बबन नरसिंग बिरादार यांच्या समक्ष दिल्याचे सांगितले आहे. २०१५-२०१६ साली दुकानाचा परवाना नुतणीकरण करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०८.२०१५ ला मी दुकान बंद केले हे मी खोटे नमुद केलेले आहे. माझे दुकान मधील व्यवसाय बंद झाल्यावर त्यांना पैसे दिलेले होते. दि.२७.०८.२०१५ ला मी दुकान पुर्ण बंद केले नव्हते कारण मी वर्ष भराचे भाडे दिले होते. लोकाकडून आलेल्या वसूली पैकी व माझ्या बचत खात्यावर काही पैसे काढून मी त्यांना दिले. मी पैसे गोळा करुन आरोपीला दिले हे दाखविण्यासाठी मी आता कागदोपत्री पुरवा दाखल करु शकत नाही. मी बॅकेमधून किती पैसे काढून आरोपीला पैसे दिले याचा कागदपत्री पूरवा मी दखल करुन शकत नाही. आरोपी व माझ्या मध्ये पैसे देणे-घेण्या मध्ये लेखी कागद झाला नव्हता. त्यांना पैसे घेतल्या बद्दलची कोणतीही पावती लिहून दिली नाही. पैसे देतो वेळीस राजेश जळकोटकर व बबन बिरादार हे माझे मित्र सोबत होते.

आरोपी यांची शेती व्यवसाया मध्ये नुकसान झाले म्हणून मी त्याला पैसे दिले होते. त्यांनी वर्षामध्ये पैसे परत करण्याचे सांगितले होते. मला माझ्या फिर्यादीतील कलम ५ मधील मजकूर दाखविला तसेच मजकूर माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञा पत्रात नमुद आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे फिर्यादीत व पुराव्याच्या प्रतिज्ञा पत्रात नमुद तीन व चार वर्षात देण्याची ठरले होते हा मजूकर खरा आहे. मगाशी मी एक वर्षामध्ये पैसे

देण्याचे ठरले होते हे खोटे आहे. दुकान बंद केल्यानंतर पैसे मालमत्ते गुंतवायचे होते हे फिर्यादीत लिहलेले आहे ते खरे व बरोबर आहे. मला दोन-तीन वर्षात पैसे देवून कोणताही फायदा नव्हता. मी आरोपीच्या भावाला, आईला, मुलांना नावानीशी ओळखू शकत नाही. आरोपी यांच्या कामाची वेळ काय आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुरुवातीची पासून आरोपीचा नंबर माझ्याकडे व माझा नंबर आरोपीकडे नव्हता. आरोपी व माझ्यात संभाषण झाले असे कोणतेही कॉल रेकॉर्ड दाखल करुन शकत नाही. २०१९ साली चेक दिला त्यानंतर माझे व आरोपीचे कधीही बोलणे झाले नाही. २०१९ पूर्वी आरोपीची व माझी भेट माझे शेत वाढवणा पाटी जवळ असल्यामुळे झाली. आरोपी कॉलेज सुटल्यावर माझ्या शेतातून जायचा त्यामुळे त्यांची भेट झाली. माझे शेतामध्ये घर असून मी तिथे राहतो.

**(न्यायालयाची कामकाजाची वेळ संपल्यामुळे पुढील तारखेपर्यंत प्रकरण तहकुब करण्यात आले.)**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by
VIJAY RAMCHANDRA
GHARAL
Date: 2026.03.04
11:40:16 +0530

दिनांकः- ०२.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर